(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XI / Issue – II ISSN 2277-8063

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

**प्रा. गीतांजली शंकरराव चव्हाण.** , (राज्यशास्त्र विभाग) समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी-काळभोर, ता: हवेली, जि: पुणे.

E-mail:- geetanjalichavan1987@gmail.com फोन नंबर:- 9503440607.

---

**प्रस्तावना:-**

लोकशाही हा शासनाचाच एक प्रकार आहे, ज्यामध्ये देशासाठी कायदे विचारपूर्वक ठरवण्याचा आणि निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार थेट किंवा प्रतिनिधी मार्फत लोकांकडे असतो. लोकशाही जिथे लोक देशासाठी निर्णय घेतात. स्वातंत्र्य आणि न्यायाची तत्वे रुजवण्याची वचन देतात. देशासाठी धोरणे तयार करणे आणि निर्णय घेणे, विचार विनिमय करणे, वाटाघाटी करणे यासाठी लोकशाही हाच आधार आहे. लोकशाही म्हणजे शासन प्रणालीचा संदर्भ आहे जिथे नागरिक मतदानाद्वारे अधिकार वापरतात. भारतात लोकशाहीला विशेष स्थान आहे, शिवाय भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. तसेच भारताची लोकशाही संविधानातून निर्माण झाली आहे. लोकशाहीचे तीन स्तंभ म्हणजे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ. जिथे प्रत्येक जण एकमेकांपासून स्वतंत्रपणे काम करतो. पत्रकारिता किंवा प्रसार माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जातो.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने लोकशाही पुढील आव्हाने हा संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन पद्धतीचा अवलंब करून संशोधन विषयाशी संबंधित द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील लेख, साप्ताहिके, इंटरनेट यांचा वापर या शोध निबंधासाठी करण्यात आला आहे.

**लोकशाहीचा अर्थ:-**

प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व निपक्षपाती निवडणुकाद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य. लोकशाही हा डेमोक्रसी या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द होय. इंग्रजीत डेमोस+क्रसी (Demos+Cracy) अशी फोड केली असून, त्यांचा अनुक्रमे 'सामान्यलोक' व 'सत्ता' असा अर्थ होतो. हा शब्द डेमोस+क्रेटोस (Demos+Kratos) या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे.

**लोकशाहीची व्याख्या:-**

लोकशाहीच्या वेगवेगळ्या राज्यशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या व्याख्या खालीलप्रमाणे-

1. अब्राहम लिंकन:- लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालवलेली शासन पद्धती म्हणजे लोकशाही.

2. महात्मा गांधी:- लोकशाही म्हणजे एक जीवन मार्ग आहे.

3. प्रा. सिली:- ज्या शासकीय संस्थेत प्रत्येकाला वाटा असतो ती लोकशाही होय.

**लोकशाही समोरील आव्हाने :-**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असणारा देश आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या जवळपास 125 कोटी आहे. भारत हा बहुभाषिक व बहुधर्मीय देश आहे, भारतामध्ये विविध धर्म, भाषा, संस्कृती असणारे लोक राहतात. त्यामुळे भारतीय जनतेचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. भारतीय लोकशाहीची प्रगती व विकास मंदावला आहे. भारतीय लोकशाही समोरील सर्वोच्च पातळीवर मोठ्या प्रमाणावर आव्हाने निर्माण झाली आहेत.

**जातीयता :-**

भारतीय राजकारणात जातीची भूमिका अद्यापही निर्णायक ठरत आहे. जातीप्रथा ही समाजाच्या, राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. त्याचा परिणाम भारतीय लोकशाही वर पडलेला दिसून येतो. देशाच्या राजकीय क्षेत्रात जाती आधारित समीकरणे जुळवणे राजकीय नेत्यांना भाग पडत आहे. राजकारणात एक पारंपारिक पण कालबाह्य दबावगट म्हणून जातीचा उल्लेख करावा लागतो. स्थानिक राजकारणापासून ते केंद्रीय पातळीपर्यंत 'जात' निर्णायक भूमिका पार पडताना दिसते. जाती शिवाय राजकीय गणिते मांडणे अवघड जाते. सर्वच जाती राजकारणावर आपला प्रभाव कसा राहील याचा प्रयत्न करत असताना दिसतात. सद्य परिस्थिती केवळ मराठा, ब्राह्मण आणि अनुसूचित जातींचे राजकारण राहिले नसून ओ.बी.सी. जातींचे राजकारण ही अत्यंत निर्णायक वळणावर आहे. त्यामुळे भारतीय राजकारणात जाती राजकारणाचे स्वरूप बदलून गेले आहे. महाराष्ट्रामध्ये मुस्लिम धर्मियांचे 'अजान' व हिंदू धर्मीयांचे 'हनुमान चालीसा' यावरुन महाराष्ट्रात हिंदू-मुस्लीम जातीय तेढ निर्माण होताना आपणाला दिसत आहे. त्यामुळे जातीयता हा घटक भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान निर्माण झाले आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था :-**

भारत हा खेड्यांचा देश आणि विकसनशील देश आहे. भारताच्या विकासामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय अडथळे आहेत. त्यामुळे लोकशाही यशस्वी होण्यात खूप मोठा अडथळा निर्माण झाला आहे. वाढती लोकसंख्या, बेकारी, दारिद्र्य, विषमता तसेच सामाजिक आणि राजकीय अस्थिरता इत्यादींचा समावेश केला जातो. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनता सर्वांगीण सर्वश्रेष्ठ असते, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात शासन हे भांडवलशाहीच्या हातातील खेळणे झालेले आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. नवीन आर्थिक धोरणाने देशात श्रीमंतीही वाढली तसेच गरिबी वाढली आहे. पैशाचा मोह कोणालाही नसावा, हे मर्यादित अर्थाने जरी खरे असले तरी, पैसा मिळवण्यासाठी सर्वजण धडपडत आहेत. ज्या शासन व्यवस्थेत आरोग्य, शिक्षण, रोजगार सुरक्षेची हमी असेल, तर लोकांना सुखी, संपन्न,

समृद्‌ध समाज निर्माण करणारी व्यवस्था निर्माण होते. पण 1991 ला नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून अमेरिकन भांडवलशाहीने जगावर प्रचंड विजय मिळवून यातूनच विषमतावादी अर्थप्रणाली उदयाला आली. भूखंड माफिया, वाळू माफिया, साखर माफिया, तेल माफिया, गुटखा माफिया, टोल माफिया, जीवनावश्यक वस्तूची साठेबाजी करणारा माफिया इत्यादी माफियाराज ची मालिका सुरू झाली. याचे मूळ भ्रष्टाचारात आढळून येते. भ्रष्टाचार हा काळ्या पैशाचा मुख्य स्त्रोत आहे आणि एवढेच नव्हे तर भ्रष्टाचार आणि काळा पैसा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**दहशतवाद :-**

‘दहशतवाद’ हे भारतीय लोकशाहीला लागलेले एक ग्रहण आहे. 1989 पासून पाकिस्तानने प्रत्यक्ष युद्‌धाचा त्याग करून छुपे दहशतवादी हल्ले करून भारताच्या अंतर्गतविकास प्रक्रियेत अडथळे निर्माण करण्यास सुरुवात केली. आजमितीला भारतामध्ये कित्येक दहशतवादी संघटना कार्यरत असल्याचे मानले जाते. चीन, बांगलादेश, नेपाळ यासारख्या शेजारील राष्ट्रांकडून भारतातील दहशतवादास मदत पुरवली जाते. मागील अनेक वर्षापासून दहशतवाद्‌यांनी नियोजित हल्ले करून मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी घडवून आणली आहे. दहशतवाद ही समस्या भारताला नाही तर संपूर्ण जगाला भेडसावणारी समस्या आहे. जगातल्या सर्वात शक्तिशाली देश अमेरिकेपासून अत्यंत गरीब देशात सुद्‌धा दहशतवाद निर्माण झाला आहे.

दहशतवादाने संपूर्ण भारतीय अंतर्गत व्यवस्था खिळखिळी करून टाकली आहे. भारतातील प्रमुख धार्मिक स्थळांना लक्ष्य करणे, धार्मिक दंगली घडवून आणणे, राजकीय नेते, पदाधिकारी यांचे अपहरण करणे सार्वजनिक ठिकाणी अंदाधुंद गोळीबार करणे, पोलीस दल आणि लष्करी ठिकाणांवर हल्ले करणे. दहशतवादामुळे सर्वसामान्यांचे जनजीवन विस्कळीत होऊन, भीतीचे वातावरण निर्माण होते. भारतात आजही काश्मिर प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तान यांच्यात आंतरराष्ट्रीय संबंध बिघडलेले आपणास दिसतात.

**फुटीरतावाद :-**

भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना फुटीरतावादाची लागण झाली आणि नंतरच्या काळात या फुटीरवादी चळवळींनी भारताच्या लोकशाहीला आव्हान दिले. स्वतंत्र काश्मीरची मागणी, स्वतंत्र बोडो लँड, खलिस्तान यासारख्या स्वतंत्र राष्ट्राची मागणी करणाऱ्या फुटीरतावादी चळवळींनी भारतीय सार्वभौमत्वाला आव्हान दिले. महाराष्ट्रातही स्वतंत्र विदर्भाची मागणी होतांना आपल्याला दिसत आहे.

**भ्रष्टाचार :-**

देश-विदेशात भ्रष्टाचारविरोधी कायदेशीर तरतुदींचा माध्यमातून यंत्रणा उभ्या असून देखील एकविसाव्या शतकात समाजामध्ये भ्रष्टाचाराच्या समस्या कायम आहेत. त्यामुळे केवळ कायदे करणे किंवा यंत्रणा उभ्या करणे पुरेसे नसून समाजातील जात, वर्ग, लिंगभावात्मक विषमता यांच्या संरचनेमुळे आणि व्यवस्थेमुळे भ्रष्टाचारासारख्या समस्येचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनत आहे. सत्तेचा गैरवापर, संपत्तीचा अवाजवी हव्यास शासकीय

आणि प्रशासकीय नियमांचे उघडपणे केलेले उल्लंघन इत्यादी मूलभूत बाबी भ्रष्टाचाराच्या मूळाशी असतात. प्रशासनातील भ्रष्टाचार हा भारतीय लोकशाही समोरील सद्यस्थितीच एक महत्त्वाचं उदाहरण आहे. भ्रष्टाचारामुळे लोकशाही यशस्वीरित्या राबवली जाऊ शकत नाही.

**निष्कर्ष :-**

भारतीय लोकशाही पुढील आव्हाने लक्षात घेतल्यानंतर असे आढळले की, भारतीय लोकशाहीला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. संसदीय लोकशाही यशस्वी होण्याकरता राजकीय नेतृत्व तसेच भारतीय समाजामध्ये संसदीय लोकशाहीची तत्वे समजणे गरजेचे आहे. मतदान करण्याची उदासिनता लोकशाही शासनाला मारक ठरते, त्यासाठी मतदाराने योग्य व लोकशाही मार्गाने काम करणाऱ्या मतदारांनाच निवडून देणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने लोकशाही यशस्वी होईल.

**संदर्भ ग्रंथ**

1. प्रा. बी. बी. पाटील, भारतीय शासन आणि राजकारण.
2. प्रा. भा. ल. भोळे जमातवाद राष्ट्र, धर्म आणि धर्मनिरपेक्षता, साकेत प्रकाशन औरंगाबाद.
3. डॉ. उमाकांत सावंत, नक्षलवादी चळवळीची विचारसरणी आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
4. डॉ. भा. ल. भोळे, भारतीय राजकीय व्यवस्था.
5. सुहास पळशीकर, समकालीन भारतीय राजकारण कॉंग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद.
6. किशोर बेडकिहाळ, भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रिया आणि स्वरूप.
7. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण.